# लोक महाविद्यालय, वर्धा

## राष्ट्रीय सेवा योजना

### अहवाल

### सत्र 2015–16

महाविद्यालयाला सत्र 2015–16 करीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने 150 विद्यार्थ्यांचे पथक मंजुर केलेले आहे. तरी महाविद्यालयाने 165 मुली व 59 मुले एकूण 224 विद्यार्थ्यांची या सत्रामध्ये नोंदणी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये रितसर अर्ज भरून विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाचे उद्घाटन करण्यात आले. त्या कार्यक्रमाला लोक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे उपस्थित होत्या. प्राचार्यांनी स्वयंसेवकांना शपथ दिली व मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले. दि. 11 जुलै 2015 ला जागतिक लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमाला प्राचार्या मा. डॉ. सौ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले.

रविवार दि. 9 ऑगष्ट 2015 ला स्वातंत्र्यदिनाच्या पुर्वी महाविद्यालयाच्या परीसराची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली व श्रमदानानंतर बौध्दिक कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये प्रा. सच्छिल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील पाटणे उपस्थित होते.

दि. 12 ऑगष्ट 2015 ला आंतरराष्ट्रीय युवा दिनांचा कार्यक्रम घेण्यात आला. एच. आय.व्ही./एड्स च्या जनजागृतीसाठी, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच घोषणा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. सामान्य रूग्णालय वर्धाच्या वतीने या कार्यक्रमाला सहाय्य करण्यात आले.

दि. 15 ऑगष्ट 2015 ला स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. झेंडा वंदनाच्या कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांची सभा घेण्यात आली व राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुढील कार्यक्रमावर विचार विनिमय करण्यात आला.

दि. 20 ऑगष्ट ते 5 सप्टेंबर या काळात सद्भावना पंधरवाडयाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्त प्रतिसाद दिला.

दि. 5 सप्टेंबर 2015 ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पूष्पहार अर्पण करण्यात आला व स्वयंसेवकांनी सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प देवून नमन केले.

दि. 8 सप्टेंबर 2015 ला आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी प्राचार्या मा. डॉ. सौ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले. दि. 24 सप्टेंबर 2015 ला राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन करण्यात आले.

दि. 02 ऑक्टोंबर 2015 ला जागतिक अहिंसा दिनाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाची साफ–सफाई करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर विद्यार्थ्यांनी भाषणे दिली.

दि. 1 डिसेंबर 2015 ला जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून सामान्य रूग्णालय वर्धाच्या सहाय्याने HIV एड्स जनजागृती विषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. नोबल शिक्षण संस्था त्या कार्यक्रमाच्या प्रायोजक होत्या. त्याप्रंसगी संचालिका सौ. शेंडे व महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. पुष्पा तायडे यांनी मार्गदर्शन केले.

दि. 10 डिसेंबर 2015 ला मानवाधिकार दिनाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

दि. 12 जानेवारी 2016 ला युवा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी स्वामी विवेकानंदाच्या जीवन कार्यावर प्रा. डॉ. विलास गिगनवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे होत्या.

दि. 15 जानेवारी ते 21 जानेवारी 2016 या कालावधीमध्ये विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर नरसाई माता मंदिर आंजी (मोठी) येथे घेण्यात आले. शिबिराचा उद्‌घाटन समारंभ दि. 16 जानेवारी 2016 ला झाला. श्री. जगदिशजी संचारिया सरपंच आंजी यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. अनवर अहमद सिद्‌दीकी यांच्या विशेष उपस्थितीत समारंभ पार पडला. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे उपस्थित होत्या. शिबिर कालखंडामध्ये आंजी येथे स्वच्छता व शौचालय बांधकाम व वापर यांच्या प्रचारासाठी विशेष रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे जि. प. वर्धा च्या स्वच्छता व पाणी पुरवठा विभागाच्या मार्गदर्शनाने सर्वेक्षणाचे काम करण्यात आले. विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर समाजसेवक व वक्त्यांनी शिबिरार्थीना मार्गदर्शन केले. त्यामध्ये प्राचार्य अशोक मेहरे, डॉ. लक्ष्मीकांत झोडे, प्रा. विवेक सोमवंशी, प्रा. गोपाल हेलोंडे, श्री. प्रशांत कुमरे इत्यादींनी बौध्दिक सत्रात मार्गदर्शन केले.

दि. 19 जानेवारी 2016 ला समारोप कार्यक्रम पार पडला. त्या कार्यक्रमाला अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार व प्रमुख वक्ते मा. प्राचार्य अशोकराव मेहरे होते.

दि. 21 जानेवारी 2016 ला शिबिर स्थळावरून महाविद्यालयाकडे प्रस्थान करण्यात आले. दि. 25 जानेवारी 2016 ला महाविद्यालयाची स्वच्छता करण्यात आली व बौध्दिक सत्र घेवून समारोप करण्यात आला.

दि. 26 जानेवारी 2016 ला स्वयंसेवक झेंडावंदनासाठी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. 31 जानेवारी 2016 ला महात्मा गांधी पुण्यतिथी कार्यक्रमांतर्गत स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्धा शहरामध्ये स्वच्छतेचे कामे केली. व गांधीजींना श्रध्दांजली अर्पण केली. वरील सर्व कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार व्यवस्थापक मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग या सर्वांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे आम्हाला सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडता आले.

प्रा. मोहन सोनूरकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा

प्रा. शत्रुघ्न मानकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा

Principal,
Lok Mahavidyalaya
WARDHA

# लोक महाविद्यालय, वर्धा

## राष्ट्रीय सेवा योजना

### विशेष श्रमसंस्कार शिबिर २०१५-१६

## अहवाल

**स्थळ : नरसाईमाता मंदिर देवस्थान आंजी (मोठी)**
**दि. 15 जानेवारी ते 21 जानेवारी 2016**
**स्वयंसेवक – 36, स्वयंसेविका – 63, एकूण – 99**

लोक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. 15 जानेवारी ते 21 जानेवारी 2016 या कालावधीमध्ये नरसाई माता मंदिर आंजी (मोठी) येथे आयोजित करण्यात आले होते. दि. 15 जानेवारीला शिबिर स्थळी आगमन दि. 16 जानेवारी 2016 ला शिबिराचे औपचारिक उद्घाटन सकाळी 11.00 वा. करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. जगदिश संचारिया सरपंच, आंजी (मोठी), डॉ. अन्वर अहमद सिद्दिकी पुर्व संयोजक राष्ट्रीय सेवा योजना म. गां. अं. हिंदी विश्वविद्यालय, उमरी मेघे व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे उपस्थित होत्या. सर्व सन्माननीय व्यक्तींनी शिबिरार्थींना समयोचित मार्गदर्शन केले. सेवेची व श्रमाची संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. शिबिरामध्ये जि. प. वर्धाच्या स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाने काही मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. त्या दृष्टीने शिबिराची रूपरेषा तयार करण्यात आली होती. संडास बांधकाम व वापर, स्वच्छता व आरोग्य असे मुख्य उद्देश डोळयासमोर ठेवून शिबिराची तयारी करण्यात आली होती. दि. 16.01.2016 ला बौध्दिक सत्रामध्ये दु. 02.00 वा. प्रा. विवेक सोमवंशी यांचे गाव व स्वच्छता या विषयावर व्याख्यान झाले. तसेच दु. 03.00 वा. डॉ. लक्ष्मीकांत झोडे, आरोग्य विभाग, यांनी शौचालय बांधकाम व वापर या विषयावर व्याख्यान देवून शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

शिबिराच्या नियोजित कार्यक्रम पत्रिकेनुसार सायंकाळी 04.00 ते 06.00 या वेळात खेळ सायंकाळी 07.00 ते 08.00 या वेळात सांस्कृतिक कार्यक्रम 08.00 ते 09.00 जेवण व नंतर दैनंदिन कामकाजाचा आढावा घेवून व पुढिल दिवसाचे नियोजन करून रात्री 11.00 वा. लाईट बंद करून झोप घेतली जायची. सकाळी 05.00 वाजता शिबिरार्थी विद्यार्थी प्रांतविधी करून सकाळी 06.00 वाजता मैदानावर योगा व प्राणायामाकरीता येत असे. व त्यानंतर चहा नाश्ता करून स. 08.00 ते 11.00 पर्यंत श्रमदान केले जायचे. त्यानंतर विद्यार्थी स्नान करून दुपारी 12.00 वाजता भोजन करून दुपारच्या बौध्दिक सत्राला हजर होत असे. असे 7 दिवस सर्व विद्यार्थी शिस्तीने वागले व मोठया प्रमाणावर श्रमदान व जनजागृती करून शिबिर यशस्वी केले.

दि. 17.01.2016 ला बौध्दिक सत्रामध्ये दुपारी 02.00 वा. श्री. सुरेशराव गणराज व दुपारी 03.00 वा. प्रा. डॉ. धनंजय सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा व श्रमाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

दि. 18.01.2016 ला बौध्दिक सत्रामध्ये दुपारी 02.00 वा. डॉ. गोपाल हेलोंडे व दुपारी 03.00 वाजता श्री. प्रशांत कुमरे यांनी समाजसेवा व युवक या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. 19.01.2016 ला सकाळी विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. डॉ. श्री. गजानन कोटेवार, अध्यक्ष लोकशिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा व विशेष उपस्थिती मा. श्री प्रकाशराव भोयर, सचिव, लोक शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा तर प्रमुख अतिथी मा. माजी प्राचार्य अशोकराव मेहरे, संस्थेचे कोषाध्यक्ष मा. प्रा. अमृतराव येउलकर, मा. प्राचार्या सौ. पुष्पा तायडे, मा. उपप्राचार्य सुनिल पाटणे मंचावर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी अंमलबजावणीचे कौतुक करून सर्व शिबिरार्थींचे अभिनंदन केले. समारोप प्रसंगी डॉ. राजीव जाधव, डॉ. विश्वनाथ बेताल, डॉ. अविनाश साहुरकर, डॉ अनिल सुरकार, प्रा. महेंद्र सहारे, इत्यादि प्राध्यापक उपस्थित होते. शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी शिबिरादरम्यान आलेले अनुभव कथन करून आपले मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. 20.01.2016 ला मदन उन्नयी प्रकल्पाला भेट देवून सहलीचे आयोजन करण्यात आले व दि. 21 जानेवारी 2016 ला सर्व शिबिरार्थींनी शिबिरस्थळाचा भावपूर्ण निरोप घेतला व महाविद्यालयाकडे प्रयाण केले.

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण भुमिका पार पाडत असते. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होण्यासाठी अशा अभ्यासपूर्ण योजना महत्वपूर्ण असतात. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना येथे वाव मिळतो. भविष्याच्या उभारणीसाठी राष्ट्रीय सेवा योजना आमच्या जीवनात मोलाची भूमिका बजावेल असा आशावाद शिबिरार्थ्यांनी व्यक्त केला.

शिबिर कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले सांस्कृतिक कार्यक्रम, अधश्रध्दा, व्यसनमुक्ती, सामाजिक वाईट चालीरितींचा बिमोड, हुंडाबळी, बुवाबाजी, वृक्षसंवर्धन, पर्यावरण, स्त्री–पुरूष समानता, स्वच्छता व शौचालयाचा वापर शेतकऱ्यांच्या आत्महत्या इ. विषयावर आयोजित करण्यात आले होते. तसेच वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पथनाटय, स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा इ. मधून मनोरंजन व शिक्षण असा हेतू साध्य करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गजाननराव कोटेवार, संस्थेचे सचिव मा. श्री. प्रकाशराव भोयर, संस्थेचे सहसचिव मा. प्रा. संजय कोटेवार, माजी प्राचार्य मा. प्रा. अमृतराव येऊलकर, मा. प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, मा. उपप्राचार्य श्री. सुनिल पाटणे, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. भाऊ दायदार, जि. प. वर्धा चा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाविद्यालयाचे सर्व सन्माननीय प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी शिबिरार्थी विद्यार्थी व नरसाई माता मंदिर आंजी (मोठी) येथील विश्वस्त श्री. जगदिश बत्रा यांच्या अनमोल सहकार्यामुळे शक्य झाले. विशेष आभार महाविद्यालयाचे कर्मचारी श्री. अन्वर खान व प्रा. राजीव धात्रक यांनी सक्रीय सहभाग नोंदवून शिबिर यशस्वी केले

प्रा. मोहन सोनूरकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा

Principal,
Lok Mahavidyalaya
WARDHA.

प्रा. शत्रुघ्न मानकर
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोक महाविद्यालय, वर्धा

साजरा का करतो याविषयी विस्तृत माहिती दिली. विवेकानंद हे तेजाच, उर्जेच, ज्ञानाच प्रतिक आहे. आपण त्याच ज्ञान आणि तेज स्विकाराव अस आव्हान श्री दाते यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. कोटेवार म्हणाले आपण विवेकानंदाचे चरित्र वाचून त्यांचा आदर्श स्विकारुन त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करावा. कारण स्वामी विवेकानंदाकडे सूर्याच तेज असूनही ते कोमल होते. कार्यक्रमाचे संचालन चावरे हीने तर आभार प्रदर्शन [illegible] यांनी केले.

दि. २६/१/२०१८ ला प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने रा.से.यो. चे विद्यार्थी ७:३० वाजता ध्वजारोहणाच्या कार्क्रमाला उपस्थित राहील.

दि. ३० जानेवारी २०१८ रोजी नेहरु युवा केंद्र व रा.से.यो. च्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी पुण्यतिथी हा 'शहीद दिवस' म्हणून कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे तर प्रमुख पाहूणे नेहरु युवा केंद्राचे समन्वयक श्री संजय माटे गांधी विचाराचे प्रवक्ते किशोर जगताप, स्काऊट गाइडचे उपायुक्त प्रा. मोहन गुजर होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रध्दांजली घेवून झाली. तीनही वक्त्यांनी महात्मा गांधीचे विचार सांगून आजही गांधीजींची अत्योदय योजना ही समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा असे आव्हान केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

दि. १५ ते २१ मार्च या दरम्यान दत्तपूर येथे श्रमदान शिबिर घेण्यात आले.

दि. २२ मार्च २०१८ रोजी निसर्ग सेवा समितीचे आव्हान केल्याप्रमाणे महाविद्यालयातील २१ स्वयंसेवक प्रा. धात्रक व प्रा. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली [illegible] टी.आय. टेकडीवर 'जागतिक जलदिन' कार्यक्रमाच्या निमित्ताने पाठविण्यात आले. सकाळी ७:३० ते ९:३० पर्यंत विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. झाडाला आळे करणे व चरे खोदणे. चरे खोदण्यामागील उद्देश मा. बेलखोडे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाणी अडवून जिरविणे हा यामागील उद्देश. त्यांनंतर मा. वनउपसंरक्षक सुनिल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मा. अतुल तराळे नगराध्यक्ष, प्रा. शेख हाशम व श्री हांडे (गुरुदेव सेवा मंडळ, प्रसारक) यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणी समस्या, त्यांचा वापर आणि पाण्याची बचत यावर सर्वांनी विचार व्यक्त केले. पाणी टंचाई दूर करायची असेल तर वनसरंक्षण आणि गावातले पाणी गावात याचे किती महत्व आहे हे सांगितले. श्रमदानामध्ये ६ महाविद्यालयातील रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या व्यतीरिक्त दर शनिवारला वेगवेगळया विषयावर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरीता बौध्दीक कार्यक्रम व रविवारला श्रमदान घेण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना,
लोक महाविद्यालय, वर्धा

Principal
Lok Mahavidyalaya
WARDHA